अस्तित्व अकॅडमी

आठवले चेंबर्स, दुसरा मजला, दैनिक गावकरी समोर, अर्पण ब्लड बँक शेजारी

रेडक्रॉस सिग्नल, नाशिक मो. नं. 9822712101

वेळ : ९० मिनिटे
प्रश्न : १०० : गुण - १००

पोलीस भरती सराव पेपर क्र-३

01. 'अब्द' या शब्दाचा पर्यायी शब्द ओळखा.

1) लक्ष 2) मेघ
3) शंभर 4) अक्ष

02. खालीलपैकी योग्य 'उद्‌गारवाचक' वाक्य ओळखा.

1) केवढा मोठा साप आहे
2) साप खूप मोठा आहे का ?
3) केवढा मोठ्ठा साप आहे नाही !
4) अरे बापरे ! केवढा मोठ्ठा साप आहे हा ..!

03. गाळलेल्या जागी योग्य शब्द लिहा.

राजीव, पंकज, अंबुज,.....

1) पीयूष 2) सरोज
3) सुधा 4) निरद

04. 'वर-पिता मुलाच्या लग्नात तोऱ्यात वावरत असतो'. अधोरेखित शब्दाची शब्दजात सांगा.

1) नाम 2) सर्वनाम
3) विशेषण 4) क्रियापद

05. पुढीलपैकी कोणता शब्द 'समुदायवाचक' आहे.

1) कळप 2) घर
3) लोखंड 4) पाणी

06. खालीलपैकी 'शुद्ध शब्दयोगी' अव्यय ओळखा.

1) कुत्रासुद्धा 2) घरच्याबाहेर
3) गावोगावी 4) मांडवाखाली

07. पुढील पर्यायातून 'अचूक' शब्द निवडा.

अंशाभ्यस्त.....

1) लाडीगोडी 2) छी छी
3) खुशी 4) लाल लाल

08. माझ्या नणंदेच्या सासूने तिला उभ्या वर्षात एकदाही माहेरी पाठविली नाही' या वाक्यातील विधेय ओळखा.

1) नणंद 2) उभ्या वर्षात एकदाही माहेरी
3) पाठविली नाही 4) सासूने

09. 'सहलीस जाताना कात्रजजवळ उजाडले.' प्रयोग ओळखा.

1) कर्तरी प्रयोग 2) शक्य कर्मणी प्रयोग
3) नवीन कर्मणी प्रयोग 4) भावे प्रयोग

10. समर्पक शब्दाच्या साह्याने पुढील वाक्य पूर्ण करा.

' अन्यायाचा.....करता करता तो अमर झाला'

1) अंगीकार 2) स्वीकार
3) तिरस्कार 4) प्रतिकार

11. 'तुम्ही कामे केलीत', हे वाक्य कोणत्या प्रयोग प्रकारातील आहे

1) कर्तृ-कर्मसंकर 2) कर्मकर्तरी
3) कर्तृ-भावसंकर 4) कर्म-भावसंकर

12. प्रचलित शुद्धलेखनानुसार चुकीचा शब्द कोणता ?

1) लघुकथा 2) गतिमान
3) वधुपरिक्षा 4) महीपाल

13. 'अशा प्रकारचे अनेक विचार आकाशातील सृष्टीचे सौंदर्य पाहून त्याने मनन करणाऱ्याच्या मनात येतील.' या वाक्यातील 'विधेयविस्तार' ओळखा.

1) विचार
2) अशा प्रकारचे अनेक
3) येतील
4) आकाशातील सृष्टीचे सौंदर्य पाहून त्याचे मनन करणाऱ्याच्या मनात

14. 'भित्यापाठी ब्रह्मराक्षस' या म्हणीचा योग्य अर्थ शोधा.

1) भीती न वाटणे
2) घाबरणे
3) भित्र्या माणसावर संकटे कोसळणे
4) जीव पट्‌दिशी जाणे

15. शुद्ध शब्दाचा पर्याय निवडा.

1) महात्म्य 2) माहात्म्य
3) माहात्म 4) महात्म

अस्तित्व अकॅडमी

16. त्याचा मोठा भाऊ गावी गेला. या वाक्याचा प्रकार ओळखा.

1) विधानार्थी 2) प्रश्नार्थी

3) उद्‌गारार्थी 4) नकारार्थी

17. कोणताही प्रत्यय न लागलेल्या पदाची विभक्ती कोणती मानतात?

1) षष्ठी 2) संबोधन

3) प्रथमा 4) तृतीया

18. पुढीलपैकी तद्भव शब्द कोणता ?

1) दगड 2) दूध

3) हाड 4) ढेकूण

19. 'मांजराकडून उंदीर मारला गेला.' या वाक्यातील कर्ता कसा आहे ?

1) चतुर्थ्यन्त 2) शब्दयोगी अव्ययान्त

3) सविकरणी तृतीयान्त 4) प्रथमान्त

20. पुढील वाक्याचा प्रकार ओळखा.

'मुलांनो, सर्वजण रांगेत उभे राहा.'

1) आज्ञार्थ 2) स्वार्थ

3) विध्यर्थ 4) संकेतार्थ

21. 'तो नेहमीच उशिरा येत असतो.' वाक्यातील काळ ओळखा.

1) साधा वर्तमानकाळ 2) रीती भविष्यकाळ

3) रीती भूतकाळ 4) रीती वर्तमानकाळ

22. खालीलपैकी समाहार द्वंद्व समासाचे उदाहरण कोणते ?

1) नास्तिक 2) नवरात्र

3) मीठभाकर 4) पीतांबर

23. वाक्याच्या शेवटी तपशील द्यावयाचा असल्यास कोणते विरामचिन्हे वापरतात ?

1) अर्धविराम 2) स्वल्पविराम

3) संयोगचिन्हे 4) अपूर्णविराम

24. 'मंदिर' हा कोणत्या प्रकारातील शब्द आहे ?

1) तद्‌भव 2) तत्सम

3) देशी 4) परभाषीय

25. 'हाजीर तो वजीर' या म्हणीचे समर्पक उदाहरण कोणते ?

1) जो कष्ट करतो त्याला यश मिळते, असे नाही.

2) अभ्यास केला की उत्तीर्ण होणारच असे नाही.

3) जो वेळेला हजर असतो त्याचा फायदा होतो.

4) ज्याला पोहता येते तो पोहणारच् असे नाही.

26. गोपाळ 100 पायऱ्या चढून एका देवालयात जातो. त्याने वर जाताना प्रत्येक पायरीवर तिच्या क्रमांकाएवढी फुले ठेवल्यास त्यास खालीलपैकी किती फुले बरोबर न्यावी लागतील ?

1) 4500 2) 5000 3) 5050 4) 5500

27. 52 ते 115 या संख्यांमधील समसंख्या आणि विषमसंख्या यांच्या बेरजेतील फरक किती ?

1) 36 2) 32 3) 43 4) 64

28. पाच क्रमवार नैसर्गिक संख्यांची बेरीज 35 आहे. तर त्यापैकी सर्वात मोठी नैसर्गिक संख्या सर्वात लहान संख्यापेक्षा कितीने मोठी आहे ?

1) 2 2) 4 3) 6 4) 8

29. $1^2 + 2^2 + 3^2 + 4^2 + \ldots\ldots\ldots + 25^2 = ?$

1) 10000 2) 105625

3) 106253 4) 105620

30. 0, 1, 2, 3 हे अंक प्रत्येक संख्येत एकदाच वापरून चार अंकी एकूण किती संख्या तयार होतील ?

1) 12 2) 16 3) 18 4) 24

31. आशाजवळची रक्कम तिप्पट करून त्यात 4 मिळवले व येणाऱ्या संख्येस 5 ने भागले, तर भागाकार 5 येतो व बाकी 0 उरते, तर आशाजवळ किती रूपये आहेत ?

1) 5 2) 8 3) 6 4) 7

32. 7 आणि 11 यांच्या लसावि ला त्यांच्या म.सा.वि. ने भागल्यास भागाकार किती येईल ?

1) 77 2) 1 3) 11 4) $\frac{11}{7}$

33. 714.2128 – 61.3202 + 8.1522 म्हणजे किती ?

1) 519.1412 2) 783.8137

3) 661.0448 4) 711.2574

34. $\frac{3.5 \times 3.5 - 0.25}{(3.5)^2 + 2 \times 0.5 \times 3.5 + (0.5)^2}$

1) 0.50 2) 3.5

3) 1.5 4) 0.75

35. 41 चे 37% करण्याऐवजी एका विद्यार्थ्याने 37 चे 41% केले, तर उत्तरात कितीचा फरक पडेल ?

1) 0 2) 41 3) 37 4) $\frac{41}{37}$

अहिल्या अॅकॅडमी

36. जर $4a = 6b = 8c$ तर $a : b : c$ म्हणजे किती ?

1) 2:3:4 2) 4:3:2 3) 6:4:3 4) 3:2:4

37. द.सा. द.शे. $8\frac{1}{3}$ दराने 1625 रूपयांची सरळव्याजाने किती वर्षात दामदुप्पट होईल ?

1) 13.5 वर्षे 2) 12 वर्षे

3) 10 वर्षे 4) 11 वर्षे

38. एका कंपनीमध्ये दरवर्षी 1000 कर्मचारी भरती केले जातात. दरवर्षी 10% कपात करण्याचे धोरण ठरविल्यास तिसऱ्या वर्षाचे सुरूवातीस किती कर्मचारी कामावर घेतले जातील ?

1) 810 2) 800 3) 729 4) 700

39. 238 (63) 112

254 (78) 98

504 (?) 386

1) 51 2) 55 3) 59 4) 60

40. माझा जन्म 11 ऑगस्टला झाला. प्रदीप माझ्यापेक्षा 11 दिवसांनी लहान आहे. या वर्षीचा स्वातंत्र्यदिन सोमवारी येतो; तर प्रदीपचा वाढदिवस या वर्षी खालीलपैकी कोणत्या वारी येईल ?

1) मंगळवार 2) बुधवार 3) गुरूवार 4) सोमवार

41. एक साधू नदीकाठी शीर्षासन करून उभा आहे; त्याचे तोंड पश्चिमेला आहे, तर त्याच्या डाव्या हातास कोणती दिशा असेल ?

1) पश्चिम 2) आग्नेय 3) दक्षिण 4) उत्तर

42. अशोकचे वय उषाच्या वयापेक्षा दुप्पट आहे; तर उषाचे वय जयंताच्या निम्मे आहे, या तिघांपैकी दोघे जुळे आहेत. तर ते कोण आहेत ?

1) अशोक व जयंता 2) अशोक व उषा

3) जयंता व उषा 4) अपुरी माहिती

43. खालील मालिकेत प्रश्नचिन्हाच्या जागी येणारी संख्या कोणती

	22		86		112
17	6	48	5	?	3

1) 34 2) 96 3) 95 4) 59

44. पुढील मालिकेत रिक्त जागी योग्य अंक भरा.

202__02__22__20220__

1) 2020 2) 2022 3) 2222 4) 0222

45. प्रश्नचिन्हाच्या जागी कोणती संख्या येईल ?

9 : 25 : : 49 : ?

1) 36 2) 64

3) 16 4) 81

46. घनाकृती ठोकळ्याच्या प्रत्येक बाजूला स्वतंत्र रंग दिले आहेत. वरच्या पृष्ठभागाला काळा रंग दिला आहे. तांबडा व पिवळा यांच्यामध्ये हिरवा रंग असून काळा व पांढरा यांच्यामध्ये निळा रंग आहे तर तळभागाला कोणता रंग आहे ? त्याचप्रमाणे निळ्या रंगाच्या विरूद्ध बाजूला कोणता रंग असेल ?

1) पांढरा, हिरवा 2) पिवळा, पांढरा

3) तांबडा, निळा 4) पांढरा, काळा

47. विधाने : इंग्लंडमधील सर्व कार्यरत डॉक्टर हुशार आहेत.

भारतातील काही डॉक्टर इंग्लंडमध्ये कार्यरत आहेत.

अनुमान :अ) सर्व हुशार डॉक्टर भारतीय आहेत.

ब) एकही भारतीय डॉक्टर हुशार नाही.

क) काही भारतीय डॉक्टर हुशार आहे.

ड) काही हुशार भारतीय डॉक्टरांनी इंग्लंडला स्थलांतर केले आहे.

खालीलपैकी अचूक अनुमान कोणते आहे/आहेत ?

1) अ आणि ड 2) ब फक्त

3) क आणि ड 4) यापैकी नाही

48. एका परीक्षेला अ, ब, क, ड आणि इ परीक्षार्थी होते. 'क' ला 'ब' पेक्षा पाच गुण जास्त मिळाले. 'ड' ला 'ब' पेक्षा दहा गुण जास्त मिळाले, पण 'अ' पेक्षा वीस गुण कमी मिळाले. 'इ'ला 'ब' पेक्षा बावीस गुण जास्त मिळाले. पण 'ब' ला चाळीस गुण मिळाले, तर 'अ' ला नेमके किती गुण मिळाले ?

1) 35 2) 70

3) 45 4) 60

49. जतीन त्याच्या घरापासून एक कि.मी. पूर्वेला चालला. नंतर उत्तरेला 3 कि.मी. चालला. नंतर डावीकडे 90° च्या कोनात वळून 5 कि.मी. चालला, तर जतीन त्याच्या घरापासून कोणत्या दिशेला व किती अंतर पोहोचला ?

1) त्याच्या घरापासून वाव्येला 8 कि.मी. अंतरावर पोहोचला.

2) त्याच्या घरापासून वायव्येला 5 कि.मी. अंतरावर पोहोचला.

3) त्याच्या घरापासून ईशान्येला 7 कि.मी. अंतरावर पोहोचला.

4) त्याच्या घरापासून ईशान्येला 5 कि.मी. अंतरावर पोहोचला.

50. मनोज प्रभाकरला म्हणाला, " तुम्ही माझ्या भावाचे मामा आहात व तुम्हाला एकच बहिण आहे. " यावरून मनोजचे त्या बहिणीशी कोणते नाते आहे ?

अहिल्या अंकेक्षण

1) भाचा 2) पुतण्या 3) भाऊ 4) मुलगा

51. चंद्रशेखर आझाद यांच्यानंतर .....यांनी 'दी हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशन' चे नेतृत्व स्वीकारले.

1) यशपालसिंग 2) भगतसिंग

3) रासबिहारी बोस 4) रामप्रसाद बिस्मिल

52) सन .....मध्ये 'क्रिप्स मिशन' भारतात दाखल झाले.

1) 1943 2) 1942 3) 1946 4) 1944

53. इ.स. 1928 हे वर्ष.....या ऐतिहासिक घटनेशी संबंधित आहे.

1) नेहरू रिपोर्ट 2) असहकार चळवळ

3) सविनय कायदेभंग 4) गांधी-आर्यविन करार

54. सन 1937 मध्ये.....या पक्षांनी बंगाल प्रांतात संयुक्त सरकारची स्थापना केली होती.

1) काँग्रेस व मुस्लीम लीग 2) कृषक प्रजा पार्टी व मुस्लीम

3) मुस्लीम लीग व स्वराज्य पक्ष 4) काँग्रेस व कम्युनिस्ट पक्ष

55. सन 1940 च्या 'वैयक्तिक सत्याग्रहा' तील पाहिले सत्याग्रही..... हे होते.

1) पंडित जवाहरलाल नेहरू 2) महात्मा फुले

3) विनोबा भावे 4) वल्लभभाई पटेल

56. खालीलपैकी कोणाची राष्ट्रपतिपदावर बिविरोधी निवड झाली आहे.

1) डॉ. नीलम संजीव रेड्डी 2) डॉ. राजेंद्रप्रसाद

3) डॉ. एस. राधाकृष्णन 4) के. आर. नारायणन

57. विषुववृत्तावर दोन रेखावृत्तांदरम्यान अंतर .....कि.मी. इतका असते.

1) 115 2) 111 3) 120 4) 135

58. महाराष्ट्रात तळ कोकणातील स्थलांतरित शेतीस काय म्हणता.

1) कुमरी 2) झुम 3) पाडू 4) बारवा

59. खालीलपैकी.....हा दिवस 'जागतिक पर्यटन दिन' म्हणून ओळखले जाते.

1) 27 सप्टेंबर 2) 27 ऑक्टोबर

3) 17 सप्टेंबर 4) 17 ऑक्टोबर

60. .....या देशास 'उगवत्या सूर्याचा देश' म्हणून संबोधले जाते

1) भारत 2) जपान 3) चीन 4) जर्मनी

61. .....ही भारतीय पानझडी अरण्यांची उदाहरणे होत.

1) पाम, बीच वृक्षांची अरण्ये

2) ऑलिव्ह, ओक वृक्षांची अरण्य

3) सागाची अरण्ये

4) मँग्रुव्ह अरण्ये

62. भारतातील.....हा मँग्रुव्ह प्रकारच्या अरण्यांत जगातील सर्वात मोठा प्रदेश आहे.

1) सुचिपर्णी 2) आर्द्र पानझडी

3) विषुववृत्तीय वने 4) सुंदरबन

63. ठाणे जिल्ह्यात.....येथे कृत्रिम रेशमी धागे तयार करण्याचा कारखानस आहे.

1) मोखाडे 2) मोहने

3) वाडे 4) मुरबाड

64. सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या उत्तरेस .....नदीच्या मुखाशी 'विजयदुर्गाची खाडी तयार झाली आहे.

1) शुक्र 2) देवगड

3) आचरा 4) कर्ली

65. महाराष्ट्रातील.....या एकमेव जिल्ह्याची सीमारेषा गोवा राज्याशी संलग्न आहे.

1) कोल्हापूर 2) रत्नागिरी

3) सिंधुदुर्ग 4) सांगली

66. पुणे जिल्ह्यातून रायगड जिल्ह्यात उतरताना.....घाट पार करावा लागतो.

1) बोर 2) आंबा

3) पसरणी 4) कसार

67. .....या शहरास ' अजिंठ्याचे प्रवेशद्वार' म्हणून ओळखले जाते.

1) जळगाव 2) नंदुरबार

3) धुळे 4) औरंगाबाद

68. राज्यसभेतील आजमितीस असलेल्या 245 सदस्यांपैकी 233 सदस्य .....निवडले जातात.

1) राष्ट्रपतीद्वारे 2) लोकसभेद्वारे

3) विधानसभेद्वारे 4) विधानपरिषदेद्वारे

69. खालीलपैकी .....हे भारतीय राज्यघटनेचे वैशिष्ट्ये नाही?

1) संघराज्यात्मक व्यवस्था 2) प्रबळ केंद्रीय सत्ता

3) आणीबाणीची तरतूद 4) दुहेरी न्यायप्रणाली

70. राज्यघटनेतील.....हा अनुच्छेद 'विधान परिषदे' ची निर्मिती या बरखास्तीशी निगडित आहे.

1) 169 2) 168

3) 180 4) 165

71. उच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या नेमणुका करतात राष्ट्रपतीस खालीलपैकी कोणचा सल्ला घेण्याची आवश्यकता नाही ?

अभिलाषा अॅकॅडमी

1) सर्वोच्च न्यायालयाचे राज्यपाल
2) संबंधित राज्यांचे राज्यपाल
3) संबंधित उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश
4) संबंधित राज्याचा मुख्यमंत्री

72. 'धन विधेयका' संबंधी खालीलपैकी योग्य पर्याय निवडा
1) धन विधेयक प्रथम लोकसभेतच मांडावे
2) धन विधेयक प्रथम राज्यसभेत मांडावे लागते.
3) धन विधेयक संसदेच्या कोणत्याही सभागृहात मांडता येते.
4) धन विधेयक सरहिशेबतपासनिपुढे मांडावे लागते.

73. 2018 चॅम्पियन ट्रॉफी हॉकी स्पर्धेचा विजेता संघ कोणता ?
1) ऑस्ट्रेलिया 2) इंग्लंड
3) भारत 4) नेदरलँड

74. 'मिस इंडिया - 2018' चा किताब कोणी मिळवला ?
1) मिनाक्षी चौधरी 2) श्रेया राव
3) अनुकृती दास 4) जया व्यास

75. सर्वाधिक वारसा स्थळे असलेले भारतातील एकमेव राज्य कोणते ?
1) केरळ 2) महाराष्ट्र
3) उत्तरप्रदेश 4) ओरीसा

76. रमेशला सुरेशपेक्षा 20% गुण कमी मिळाले, तर सुरेशला रमेशपेक्षा किती टक्के गुण जास्त मिळाले ?
1) 25 2) 30
3) 15 4) $12\frac{1}{2}$

77. एका सुसम बहुभुजाकृतीच्या बाह्यकोनाचे माप आंतरकोनाच्या मापाच्या $\frac{1}{5}$ इतके आहे. तर त्या बहुभुजाकृतीला बाजू किती ?
1) 8 2) 10
3) 12 4) 15

78. एका रक्कमेचे 2 वर्षाचे सरळव्याज 200 रू. आणि चक्रवाढ व्याज 212.50 रू. येते, तर ती रक्कम कोणती ?
1) 600 रू. 2) 900 रू.
3) 1200 रू. 4) 800 रू.

79. एका चाकाचा व्यास 1.75 मीटर आहे, तर 11 किमी अंतरामध्ये चाकाचे किती फेरे होतील ?
1) 1600 2) 1800
3) 1000 4) 2000

80. 12 सेमी त्रिज्या व 50 सेमी उंची असलेल्या दंडगोलाकृती मापाने द्रवाचे एक माप भरून 10 सेमी त्रिज्या असलेल्या एका दंडगोलाकृती पिंपात ओतल्यास द्रव्य किती उंचीपर्यंत राहील ?
1) 60 सेमी 2) 80 सेमी
3) 72 सेमी 4) 84 सेमी

81. BHE, CIF, DJG, EKH,.....
1) FIL 2) FLI
3) FMJ 4) FJM

82. पुढील मालिकेत रिकाम्या जागी योग्य अंक भरा ?
202- 02-22-20220-
1) 2020 2) 2022
3) 2222 4) 2220

83. 5184 : 72 : : 8464 ?
1) 82 2) 92
3) 72 4) 98

84. 'RECRUITMENT' हा शब्द जर ' MENTTIURCER' असा लिहिला असेल, तर ' EXAMINATION' हा शब्द कसा लिहाला ?
1) EAIXMNOITAN 2) NOITANIMAXE
3) TIONANIMAXE 4) MINATIONEXA

85. जर WATCHING=30, WORKING=30, COMING =10, COACHING =10, तर MAKING = ?
1) 20 2) 30
3) 10 4) 32

86. रोहन उत्तर दिशेला 3 कि.मी. चालत गेला. नंतर तो त्याच्या डावीकडे वळला आणि 2 कि.मी. चालत गेला. तो पुन्हा डावीकडे वळला आणि 3 कि.मी. चालत गेला. या ठिकाणाहून तो डावीकडे वळला आणि 3 कि.मी. चालला. सुरूवातीच्या ठिकाणापासून तो किती अंतरावर आहे ?
1) 1 कि.मी. 2) 2 कि.मी.
3) 3 कि.मी. 4) 5 कि.मी

87. राजन कुमारचा मुलगा आहे.शीला रजनीची मुलगी आहे. कुमार रजनीचे सासरे आहेत तर राजनचे शीलाशी नाते काय?
1) भाऊ 2) मेहूणा
3) वडील 4) मुलगा

अभिलाषा अॅकॅडमी

88. प्रश्नचिन्हाच्या ठिकाणी कोणती संख्या येईल ?

2	**17**	**5**
11	**?**	**13**
7	**19**	**3**

1) 15 2) 23

3) 25 4) 33

89. मानवी शरीरातील ' रासायनिक संदेशवाहक' म्हणून ओळखला जाणारा घटक खालील पर्यायापैकी कोणता ?

1) प्रेरक 2) संप्रेरक

3) चेतातंतू 4) चेतारज्जू

90. खालील पर्यायापैकी 'संपर्कजन्य रोग' कोणते ?

1) गजकर्ण व गाऊट 2) गाऊट व कुष्ठरोग

3) कुष्ठरोग व इसब 4) इसब व गजकर्ण

91. तंबाखू खाल्यामुळे खालीलपैकी कोणते घातक पदार्थ निर्माण होतात ?

अ) निकोटिन ब) टार

क) कार्बन मोनॉक्साईड

1) फक्त 'अ' आणि 'ब' 2) फक्त 'ब' आणि 'क'

3) फक्त 'क' आणि 'अ' 4) तिन्ही 'अ' 'ब' आणि 'क'

92. खालीलपैकी अयोग्य विधानाचा पर्याय कोणता ?

1) प्रामुख्याने पक्ष्यांमध्ये अपत्यांची लिंगनिश्चिती मादीकडून संक्रमित होणाऱ्या गुणसूत्रांवरून ठरते.

2) प्रामुख्याने पक्ष्यांतील नरांमध्ये xy गुणसूत्र असतात.

3) फुलपाखरांसारख्या कीटकांच्या मादीत xy गुणसूत्रे असतात.

4) मानवामध्ये आढळणाऱ्या गुणसूत्रांच्या स्थितीच्या विरूद्ध स्थिती काही अपवाद वगळता पक्ष्यांच्या नर व मादीतील गुणसूत्रांत आढळते.

93. बटाटे व कांदे यांसारख्या भाज्यांना कोंब येऊन त्या नासू नयेत यासाठी कशाचा उपयोग होतो ?

1) श्राव्यातील ध्वनी 2) कॅरमलायझेशन पद्धती

3) गॅमा किरणांचा मारा 4) पाश्चरायझेशन पद्धत

94. मानव संसाधन विभागाचे केंद्रीय मंत्री श्री प्रकाश जावडेकर यांनी रूसा (RUSA) साठीचे पोर्टल आणि मोबाईल ॲप सुरू केले. तेंव्हा रूसा (RUSA) म्हणजे काय ?

1) राजकीय उच्च शिक्षण अभियान

2) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान

3) राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षण आंदोलन

4) रिजनल उच्च शिक्षा अभियान

95. जी. एस. टी (GST) ची अंमलबजावणी कोणत्या घटनादुरूस्ती कायद्याने करण्यात आली ?

1) 101 2) 108

3) 120 4) 106

96. खालीलपैकी ओझोनचे सर्वात मोठे मारक शत्रू कोणते ?

1) क्लोरिन व नायट्रोजन 2) कार्बन मोनोक्साइड

3) कार्बन डायऑक्साईड 4) सल्फर डायऑक्साईड

97. श्री सुंदरलाल बहुगुणा यांच्या नेतृत्वाखाली भारतातील कोणत्या राज्यात कोणती चळवळ उभारली होती ?

1) चिपको चळवळ- उत्तराखंड

2) सायलेंट व्हॅली चळवळ - केरळ

3) नर्मदा बचाव आंदोलन - मध्य प्रदेश

4) ॲपिको चळवळ - कर्नाटक

98. 'रन फॉर लाडली हाफ मॅरेथॉन स्पर्धा' कोणत्या कारणासाठी आयोजित करण्यात आली होती ?

1) महिला सुरक्षासंबंधीत लोकांमध्ये जागरूकता निर्माण होण्यासाठी

2) लहान मुलांबद्दल जागरूकता निर्माण करणे व त्यांच्या उज्वल भविष्यासाठी

3) लहान मुलींच्या भविष्याबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी

4) दिव्यांगाप्रती लोकांमध्ये प्रेम निर्माण करण्यासाठी

99. भारतात वार्ताहरांचे हल्ल्यापासून संरक्षण करणारा कायदा मंजूर करणारे खालीलपैकी कोणते राज्य पहिले ठरले आहे ?

1) गोवा 2) हरियाणा

3) महाराष्ट्र 4) मध्यप्रदेश

100. सन 2018 पर्यंत भारताची कोणती सीमा बंद केली जाणार असल्याची घोषणा भारताच्या गृहमंत्र्यांनी केली आहे ?

1) भारत - पाकिस्तान 2) भारत - नेपाळ

3) भारत- बांगलादेश 4) भारत- श्रीलंका

अभिलाषा अकॅडमी

उत्तरसूची

1 - 2	21 - 4	41 - 4	61 - 3	81 -2	
2 - 4	22 - 3	42 - 1	62 - 4	82 -3	
3 - 2	23 - 4	43 - 4	63 - 2	83 -2	
4 - 3	24 - 2	44 - 3	64 - 1	84 -3	
5 - 1	25 - 3	45 - 4	65 - 3	85 -1	
6 - 1	26 - 3	46 - 1	66 - 1	86 -1	
7 - 1	27 - 2	47 - 3	67 - 1	87 -3	
8 - 3	28 - 2	48 - 2	68 - 3	88 -2	
9 - 4	29 - 2	49 - 2	69 - 4	89 -4	
10 - 4	30 - 3	50 - 4	70 - 1	90 -4	
11 - 1	31 - 4	51 - 1	71 - 4	91 -4	
12 - 3	32 - 1	52 - 2	72 - 1	92 -2	
13 - 4	33 - 3	53 - 1	73 - 1	93 -3	
14 - 3	34 - 4	54 - 2	74 - 3	94 -2	
15 - 2	35 - 1	55 - 3	75 - 2	95 -3	
16 - 1	36 - 3	56 - 1	76 - 1	96 -2	
17 - 3	37 - 2	57 - 2	77 - 3	97 -4	
18 - 2	38 - 1	58 - 1	78 - 4	98 -1	
19 - 2	39 - 3	59 - 1	79 - 4	99 -3	
20 - 1	40 - 4	60 - 2	80 - 3	100 -1	

अहिंदी अलर्ट

अहिंसा अकॅडमी